# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 03 October 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ०३ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- आदिशक्तीच्या साडेतीन शक्तीपीठांसह सर्वत्र घटस्थापनेनं शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ.
- अल्पवयीन आरोपींची वयोमर्यादा १८ वरून १४ वर्ष करण्याचा विचार– उपमुख्यमंत्री अजित पवार.
- आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी माजी क्रिकेटपटू मोहम्मद अझहरुद्दीन यांना ईडीचं समन्स जारी.

आणि

- महिलांच्या आयसीसी टी–ट्वेंटी विश्वकरंडक स्पर्धेला आजपासून शारजा इथं सुरुवात.

****

शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून प्रारंभ झाला. राज्यात आदिशक्तीच्या साडे तीन शक्तीपीठांसह देवीच्या सर्वच मंदिरांमध्ये पारंपरिक पद्धतीनं घटस्थापना करण्यात आली.

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथल्या तुळजाभवानी मातेच्या मंदिरात मंदिर समितीचे अध्यक्ष तथा धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते सपत्नीक विधिवत घटस्थापना करण्यात आली. त्यापूर्वी घटाची कल्लोळतीर्थापासून वाजत गाजत मिरवणूक करण्यात आली. यावेळी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नऊ दिवस चालणाऱ्या या शारदीय नवरात्र महोत्सवात देवीच्या विविध अलंकार महापूजा मांडण्यात येतात.

****

नांदेड जिल्ह्यात माहूर इथंही रेणुका देवीच्या नवरात्रोत्सवाला आज घटस्थापनेनं प्रारंभ झाला. नागरिकांनी आज पहिल्या माळेला देवीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केल्याचं दिसून आलं. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज रेणुकामातेचं दर्शन घेतलं. नवरात्रोत्सव कालावधीत भाविकांच्या वाहतुक सेवेसाठी एसटीच्या ११० बस उपलब्ध राहणार आहेत. तसंच ३ आरोग्य पथकंही नियुक्त करण्यात आली आहेत

****

कोल्हापूर इथं करवीर निवासिनी अंबाबाई देवीची पूजा श्रीसूक्तवर्णित श्रीमहालक्ष्मी रुपात बांधण्यात आली. मंदिरात सकाळी अभिषेक पूजा झाल्यानंतर घटस्थापना झाली. यानंतर तोफेची सलामी देण्यात आली. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव शिवराज नाईकवाडे यांच्या हस्ते शासकीय अभिषेक पूजा करण्यात आली.

****

नाशिक जिल्ह्यात वणी इथं सप्तशृंगी देवीची प्रधान आणि जिल्हा सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी यांच्या हस्ते सकाळी महापूजा करण्यात आली. त्यापूर्वी देवीच्या अलंकाराची भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर गडावर महापूजा करून घटस्थापना करण्यात आली.

****

अंबाजोगाई इथं श्री योगेश्वरी देवीची बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज सकाळी सपत्निक महापूजा केली. वर्णीपूजेनंतर घटस्थापनेनं देवीच्या नवरात्राला प्रारंभ झाला. १२ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या उत्सवात दररोज भजन, कीर्तन, प्रवचन, आदी उपक्रम राबवले जाणार आहेत.

****

खान्देश कुलस्वामिनी असलेल्या धुळ्याच्या एकविरा देवीची आज नवरात्राच्या पहिल्या दिवशी खासदार डॉ. शोभा दिनेश बच्छाव यांच्याहस्ते पूजा आरती करण्यात आली, भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं कर्णपुरा परिसरातील तुळजाभवनी मंदीरात, सिडको इथल्या रेणुका माता मंदीरात तसच हर्सुल इथल्या हरसिध्दी माता मंदीरासह शहरातील विविध मंदीरात घटस्थापना करण्यात आली आहे. कर्णपुरा मंदीरात विधान परिषदेचे

विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या हस्ते आज घटस्थापनेनंतर आरती करण्यात आली.

****

नागपूर जिह्यातल्या कोराडी इथल्या श्री महालक्ष्मी जगदंबेच्या आश्विन नवरात्र उत्सवाला आज मोठ्या आनंदात सुरुवात झाली. काँग्रेस पक्षाच्या प्रदेश समितीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी आज श्री महालक्ष्मी जगदंबेचे दर्शन घेतलं.

****

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने नागपूर इथं दीक्षाभूमीवर येणाऱ्या लाखो बौद्ध अनुयायांच्या सोयीसाठी आवश्यक सुविधांची तयारी लवकरात लवकर पूर्ण करा, असे निर्देश नागपूर महानगर पालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले आहेत. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने दीक्षाभूमीवरील सुविधांचा चौधरी यांनी आज आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

****

बुलढाणा जिल्ह्यात खामगांव तालुक्यातल्या घाटपुरी इथं श्री महर्षी वेद व्यास प्रतिष्ठान, आळंदी अंतर्गत जय जगदंबा वेद विद्यालयाच्या नवीन वास्तूचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज भूमिपूजन करण्यात आलं. यावेळी संस्थांनच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधला. या भूमिपूजन कार्यक्रमास केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण तथा आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, अयोध्येच्या श्रीराम जन्मभूमी तिर्थक्षेत्राचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज, आमदार आकाश फुंडकर, आमदार संजय गायकवाड, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

अल्पवयीन आरोपींची वयोमर्यादा १८ वरून १४ वर्ष करण्याचा विचार असल्याचं, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. अधिकारी वर्गाकडूनही अशी मागणी केली जात असल्याचं पवार यांनी सांगितलं.

****

राज्य शासनाने युवकांच्या विकासासाठी कौशल्य विद्यापीठ स्थापन केलं, ही अत्यंत अभिमानाची बाब असून राज्याच्या कौशल्य विकास विभागाने नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे देशात आपली वेगळी ओळख निर्माण केली, असे कौतुकोद्गार केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी काढले आहेत. मुंबईच्या एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय इथं आय. टी. आय मुंबईचे नामकरण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंबई असं करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र हे देशातील एकमेव कौशल्य विद्यापीठ आहे, ज्यामध्ये कौशल्ययुक्त शिक्षण देऊन प्रत्यक्ष रोजगार देण्यावर भर दिला जात आहे, असं चौधरी म्हणाले.

****

हैदराबाद मुक्तीसंग्रामाचे नेते माजी खासदार व्यंकटेश भगवानराव खेडगीकर उर्फ स्वामी रामानंद तीर्थ यांची एकशे एकवीसावी जयंती आज साजरी होत आहे. यानिमित्तानं मराठवाड्यात स्वामीजींना अभिवादन करून त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वामीजींना ट्विट संदेशातून आदरांजली अर्पण केली. हैद्राबाद मुक्तीसाठी सर्वस्व पणाला लावणारे सेनापती तसंच आध्यात्मिकता आणि राजकारण यांचा विलक्षण संयोग साधणारे लोकप्रिय नेतृत्व, शिक्षणतज्ज्ञ स्वामी रामानंद तीर्थ यांच्या मौलिक जीवनप्रवासास विनम्र अभिवादन, असं मुख्यमंत्र्यांनी या संदेशात म्हटलं आहे.

****

काँग्रेस नेते लोकसभेतील विरोधी पक्ष नेते खासदार राहुल गांधी उद्यापासून दोन दिवसांच्या कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. कसबा बावडा इथल्या भगवा चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण गांधी यांच्या हस्ते होणार असून शनिवारी होणाऱ्या संविधान सन्मान संमेलनाला ते उपस्थित राहणार आहेत, विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील यांनी ही माहिती दिली.

****

हैदराबाद क्रिकेट असोसिएशनमध्ये अध्यक्षपदाच्या कार्यकाळात आर्थिक गैरव्यवहार केल्या प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने माजी क्रिकेटपटू मोहम्मद अझहरुद्दीन यांच्या विरोधात समन्स जारी केलं आहे. हैदराबादच्या उप्पल इथल्या राजीव गांधी क्रिकेट मैदानासाठी डिझेल जनरेटर, अग्निशामक यंत्रणा आणि छत यांच्या खरेदीत

२० कोटी रुपयांचा कथित गैरव्यवहार केल्याच्या प्रकरणावरुन हे समन्स जारी करण्यात आलं आहे.

****

महिलांच्या आयसीसी टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेला आजपासून शारजा इथं सुरुवात होत आहे. बांग्लादेश आणि प्रथमच खेळणारा स्कॉटलंड यांच्या उद्घाटनाचा सामना होत आहे. भारताचा पहिला सामना उद्या न्यूझीलंडसोबत होणार आहे. येत्या २० तारखेपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत दहा संघ उतरले आहेत. ऑस्ट्रेलियाच्या महिलांनी या स्पर्धेत मागील तीनही वेळा विजेतेपद मिळवलं असून, भारतीय संघाला अद्याप एकदाही विजेतेपद मिळालेलं नाही. मुख्य स्पर्धेपूर्वी झालेल्या सराव सामन्यांमध्ये भारतीय महिलांनी दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज यांना पराभूत केलं.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या परंडा इथले शिवसेनेचे माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या पार्थिव देहावर आज दुपारी परांडा इथं अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, माजी खासदार रवींद्र गायकवाड, आमदार विक्रम काळे, धाराशिवचे आमदार कैलास पाटील यांच्यासह सर्वपक्षीय राजकीय लोकप्रतिनिधी तसेच भूम परंडा वाशी परिसरातील हजारो नागरिक उपस्थित होते.

****

छत्रपती संभाजीनगर इथं लायन्स इंटरनॅशनल क्लबच्या वतीने येत्या ८ ऑक्टोबरपर्यंत शहरात लायन्स सेवा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. आज शहरातल्या उल्कानगरी इथं स्वच्छता अभियान आणि रक्तदान शिबिर घेण्यात आलं. याप्रसंगी महानगरपालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आलं. यंदाच्या वर्षी १५ समाजोपयोगी उपक्रम राबवून सेवा सप्ताह साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती लायन्स क्लबचे अध्यक्ष नंदकिशोर मालपाणी यांनी दिली आहे

****

परभणी इथं विविध तपासणी केलेल्या ४ हजार ज्येष्ठ नागरिकांना विविध प्रकारच्या १७ हजार सहाय्यक साधनांचं उद्या मोफत वाटप करण्यात येणार आहे. एकाच मतदार संघात सर्वाधीक लाभार्थी असणारा हा देशातील पहिलाच उपक्रम असल्याची माहिती परभणीचे आमदार डॉ.राहुल पाटील यांनी दिली आहे. काठी, कोपर काठी, अल्युमिनीयम कुबड्या, तीन पायाची काठी, चार पायाची काठी,

श्रवणयंत्र, घडीचे वॉकर, नंबरचा चष्मा, चाकांची खुर्ची आदी साहित्याच्या समावेश.

****